म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १६८७०
१६८७०
REFBK-0014084
REFBK-0014084





## कुंदाचा वाढदिवस

# जीवन-ओघ

कवि—वसंत माधव खाडिलकर—

# जीवन ओघ

( मुकुंदाचा वाढदिवस व इतर कविता )

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 3७६९९ वि: काव्य.
क्रमांक १९२७० नों दि ५।२।६५
१८०६

जीवनांत येणाऱ्या अडथळ्यांना वेळोवेळीं
दूर करून माझा जीवन ओघ
जिनें वाहता ठेवला आहे
त्या माझ्या

ती. आईस
सादर समर्पण.

REFBK-0014084
REFBK-0014084

—वसंत माधव खाडिलकर.

स्वस्त तिसरी आवृत्ति मूल्य : एक रुपया

# जीवितौघाच्या कांठावर

## महाराष्ट्र कवि यशवंत यांचा दुसऱ्या आवृत्तीचा आशीर्वाद

श्री. वसंतराव खाडिलकर यांचा कविता करण्याचा छंद ह्या संग्रह-रूपानें प्रथमच माझ्या नजरेंस येत आहे. रसानुकूल चालींत कविता म्हणून दाखवून अभ्यासकाला ती रसग्रहणसुलभ करून देणें हा परिपाठहि त्यांनीं ठेवला आहे. अशा काव्यसेवकाला जें संचित जोडतां आलें तें हें. सांसारिक त्याचप्रमाणें सामाजिक अशा दुहेरी स्वरूपाच्या सुखदु:खांची ही कविता. स्वातंत्र्योत्तर आपल्या सार्वजनीन जीविताला येत चाललेली अवकळा पाहून कवीस चीड वाटत आहे. त्या चिडींतून जसे इशाऱ्याचे बोल ऐकूं येतात (उदा० जनतेचा पुकार, माणुसकीला जाग) तसेच अभिमानाचे हुंकारहि निनादतात (उदा० प्रणाम माझा, आज उभा हा मानव, आकांक्षा). कवितेला कांहीं ठिकाणीं शाहिरी स्वरूप आलें आहे, रचनेंत मधून-अधून अनवधानतेनें शिथिलताहि राहून गेली आहे, आणि इंग्रजी शब्द वापरण्याची मुभाहि कवीनें घेतली आहे. तथापि विनोद, उपरोध, चिमटे इत्यादिकांच्या लहरीहि ह्या ओघावर तरंगतांना दिसतात. संसारविषयक कवितांतील आर्तता अनुभवाची असल्यामुळें त्या त्या कविता चित्तस्पर्शी वाटतात. सुखांतिका कीं, प्रतीक्षा, अंगाई, अजून जायचे दूर, ह्या कविता आवर्जून पहाव्यात. आशा आहे कीं "जीवनौघ" पुढें पुढें रम्य वळणें-वांकणें घेत जाऊन धीर-गंभीर व भव्य असें रूप धारण करील.

२८।४।५८. **यशवन्त दि. पेण्ढरकर**

ग्रंथ संग्रहालय ... ३७८८९ ... दि: ... ७८१७५ ... १८७० ... दि ... ५१२।६५

# उगमापाशीं

" जीवन ओघ "ची ही तिसरी स्वस्त आवृत्ति प्रकाशित होत आहे. यांत पहिल्या आवृत्तींतील निवडक अठरा कविता असून नवीन पस्तीस कविता आहेत. जीं गीतें भाव करून म्हटलीं जातात व जीं अशीं म्हटल्यामुळें म्हणणा राला भाव येतो तीं भावगीतें ! अशा आजच्या भावगीतांच्या जमान्यांत काव्य-संग्रह प्रसिद्ध करणें थोडें अवघड असलें तरी रसिकांच्या रसिकते वरचा माझा विश्वास कायम असल्यामुळें व तसा प्रत्यय माझें काव्य-गायनांत नित्य मला येत असल्यामुळें हें प्रसिद्धीकरण करीत आहें.

काव्यें नुसतीं लिहून त्यांची पूर्ति होत नाहीं. ती व्हावयास अर्थपोषक अशा रागांची चालीसाठीं निवड करून लयबद्धतेनें व परिणामकारकरितीनें ( अर्थानुरूप स्वर कमी-जास्त करून, मुद्रेवर काव्याचे भाव उमटून ) म्हटलीं गेलीं पाहिजेत. अशा रितीनें म्हटल्या गेलेल्या काव्याचें संपूर्ण स्वरूप श्रोत्यां-पुढें मूर्तिमंत उभें रहाते व कवि, गायक व श्रोता यांची सम साधते.

या संग्रहांतील काव्यासंबंधीं मला एवढेंच नमूद करावयाचें आहे कीं, यांतील सर्व कविता वास्तवतेच्या भूमिकेवर अधिष्ठित आहेत. " न देखे रवि ते देखे कवि " ही कवीच्या कार्यक्षेत्राची उंची असली तरी इथें मात्र " जें देखे कवि तें त्यांच्या वहीं " अशी परिस्थिति आहे. जीवनाची अनुभूती व साक्षात्कार यांचें प्रतिबिंब कविकार्यामध्यें नेहमींच पाहावयास सांपडतें. माझी कविता कौटुंबिक मध्यवर्गीय जीवन यांची मर्यादा ओलांडून जात नाहीं याची मला जाणीव आहे. कौटुंबिक जीवन सामान्यांचा मानबिंदू आहे. सामान्य माणसासाठीं सामान्य माणसानें लिहिलेल्या या कविता सामान्य असल्या तरी काव्याचा रसिकवर्ग त्या गोड मानून त्यांचें स्वागत करील व मजवरचा लोभ कायम ठेवील अशी आशा आहे.

सर्वांचा नम्र,

ता. ९ सप्टेंबर १९६४

वसंत माधव खाडिलकर
१२८६ सदाशिव पेठ,
चिमण्यागणपती चौक पुणें २.

# जीवितौघाच्या कांठावर

## महाराष्ट्र कवि यशवंत यांचा दुसऱ्या आवृत्तीचा आशीर्वाद

श्री. वसंतराव खाडिलकर यांचा कविता करण्याचा छंद ह्या संग्रह-रूपानें प्रथमच माझ्या नजरेंस येत आहे. रसानुकूल चालींत कविता म्हणून दाखवून अभ्यासकाला ती रसग्रहणसुलभ करून देणें हा परिपाठहि त्यांनीं ठेवला आहे. अशा काव्यसेवकाला जें संचित जोडतां आलें तें हें. सांसारिक त्याचप्रमाणें सामाजिक अशा दुहेरी स्वरूपाच्या सुखदुःखांची ही कविता. स्वातंत्र्योत्तर आपल्या सार्वजनीन जीविताला येत चाललेली अवकळा पाहून कवीस चीड वाटत आहे. त्या चिडींतून जसे इशाऱ्याचे बोल ऐकूं येतात (उदा० जनतेचा पुकार, माणुसकीला जाग) तसेच अभिमानाचे हुंकारहि निनादतात (उदा० प्रणाम माझा, आज उभा हा मानव, आकांक्षा). कवितेला कांहीं ठिकाणीं शाहिरी स्वरूप आलें आहे, रचनेंत मधून-अधून अनवधानतेनें शिथिलताहि राहून गेली आहे, आणि इंग्रजी शब्द वापरण्याची मुभाहि कवीनें घेतली आहे. तथापि विनोद, उपरोध, चिमटे इत्यादिकांच्या लहरीहि ह्या ओघावर तरंगतांना दिसतात. संसारविषयक कवितांतील आर्तता अनुभवाची असल्यामुळें त्या त्या कविता चित्तस्पर्शी वाटतात. सुखांतिका कीं, प्रतीक्षा, अंगाई, अजून जायचे दूर, ह्या कविता आवर्जून पहाव्यात. आशा आहे कीं "जीवनौघ" पुढें पुढें रम्य वळणें-वांकणें घेत जाऊन धीर-गंभीर व भव्य असें रूप धारण करील.

२८।४।५८.

यशवन्त दि. पेण्ढरकर

ग्रंथ संग्रहालय

# उगमापाशीं

" जीवन ओघ "ची ही तिसरी स्वस्त आवृत्ति प्रकाशित होत आहे. यांत पहिल्या आवृत्तींतील निवडक अठरा कविता असून नवीन पस्तीस कविता आहेत. जीं गीतें भाव करून म्हटलीं जातात व जीं अशीं म्हटल्यामुळें म्हणणा राला भाव येतो तीं भावगीतें ! अशा आजच्या भावगीतांच्या जमान्यांत काव्य-संग्रह प्रसिद्ध करणें थोडें अवघड असलें तरी रसिकांच्या रसिकते वरचा माझा विश्वास कायम असल्यामुळें व तसा प्रत्यय माझें काव्य-गायनांत नित्य मला येत असल्यामुळें हें प्रसिद्धीकरण करीत आहें.

काव्यें नुसतीं लिहून त्यांची पूर्ति होत नाहीं. ती व्हावयास अर्थपोषक अशा रागांची चालीसाठीं निवड करून लयबद्धतेनें व परिणामकारकरितीनें ( अर्थानुरूप स्वर कमी-जास्त करून, मुद्रेवर काव्याचे भाव उमटून ) म्हटलीं गेलीं पाहिजेत. अशा रितीनें म्हटल्या गेलेल्या काव्याचें संपूर्ण स्वरूप श्रोत्यां-पुढें मूर्तिमंत उभें रहाते व कवि, गायक व श्रोता यांची सम साधते.

या संग्रहांतील काव्यासंबंधीं मला एवढेंच नमूद करावयाचें आहे कीं, यांतील सर्व कविता वास्तवतेच्या भूमिकेवर अधिष्ठित आहेत. " न देखे रवि ते देखे कवि " ही कवीच्या कार्यक्षेत्राची उंची असली तरी इथें मात्र " जें देखे कवि तें त्यांच्या वहीं " अशी परिस्थिति आहे. जीवनाची अनुभूती व साक्षात्कार यांचें प्रतिबिंब कविकार्यामध्यें नेहमींच पाहावयास सांपडतें. माझी कविता कौटुंबिक मध्यवर्गीय जीवन यांची मर्यादा ओलांडून जात नाहीं याची मला जाणीव आहे. कौटुंबिक जीवन सामान्यांचा मानबिंदू आहे. सामान्य माणसासाठीं सामान्य माणसानें लिहिलेल्या या कविता सामान्य असल्या तरी काव्याचा रसिकवर्ग त्या गोड मानून त्यांचें स्वागत करील व मजवरचा लोभ कायम ठेवील अशी आशा आहे.

सर्वांचा नम्र,

ता. ९ सप्टेंबर १९६४

वसंत माधव खाडिलकर
१२८६ सदाशिव पेठ,
चिमण्यागणपती चौक पुणें २.

# अनुक्रमणिका


| क्र. | कवितेचें नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | काव्य-दालन | ... ५ |
| २ | सावधान | ... ६ |
| ३ | विहिण | ... ८ |
| ४ | पहिलें पाऊल | ... ८ |
| ५ | तुझी साउली | ... ९ |
| ६ | सुग्रास भोजनालय | ... ९ |
| ७ | मुकुंदाचा वाढदिवस | ...१० |
| ८ | असली नकली | ...११ |
| ९ | अलंकार | ...१२ |
| १० | डोहाळे | ...१३ |
| ११ | पाळणा | ...१३ |
| १२ | मालुनतोद | ...१४ |
| १३ | प्रगति-पत्रक | .. १५ |
| १४ | दोन आघाड्या | ...१६ |
| १५ | किरकोळ आणि वट्ट | ...१६ |
| १६ | मी, मनी व पोर | ...१७ |
| १७ | ताई आणि भाऊ | ...१९ |
| १८ | सुखांतिका की ? | ...१९ |
| १९ | प्रतीक्षा | ...२० |
| २० | अंगाई | ...२१ |
| २१ | हार | ...२२ |
| २२ | अजून जायचें दूर | ...२२ |
| २३ | भवानि तारी तारी मजला | ...२३ |
| २४ | जुन्या घराला विसरूं नको | ...२४ |
| २५ | पन्नाशीची झुळुक | ...२५ |
| २६ | दिवाळी | ...२५ |
| २७ | सांगणें आणि मागणें | ...२६ |
| २८ | भैरवी | ...२७ |
| २९ | घेऊनि जा मज | .. २८ |
| ३० | महाकवीस सवाल | ...२९ |
| ३१ | कांचनपुरी | ...३० |
| ३२ | होरी | ...३० |
| ३३ | नर्तिका | ...३१ |
| ३४ | हिची कहाणी | ...३१ |
| ३५ | सावित्रीची कहाणी | ...३२ |
| ३६ | बेकाराचें प्रेमगीत | ...३३ |
| ३७ | कलेस | ...३४ |
| ३८ | पृथ्वीचा पट | ...३४ |
| ३९ | दुःखापोटी सुख जन्मतें | ...३५ |
| ४० | कशाविना काय नाहीं | ...३६ |
| ४१ | पुण्याची गम्मत जम्मत | ...३७ |
| ४२ | स्वातंत्र्योत्तर दिवाळी | ...३९ |
| ४३ | जनतेचा पुकार | ...४० |
| ४४ | कर ! कर ! ! आणि कर ! ! ! | ४१ |
| ४५ | मानवतेस हांक | ...४१ |
| ४६ | शांतीचा ढोल | ...४२ |
| ४७ | रामराज्य | ...४३ |
| ४८ | प्रणाम माझा | ...४४ |
| ४९ | आज उभा हा मानव | ...४४ |
| ५० | गिरके | ...४५ |
| ५१ | नवेंच गाणें | ...४६ |
| ५२ | आरोहण का ? | ...४७ |
| ५३ | आकांक्षा ! | ...४८ |

## १. शारदेच्या मंदिरांतील काव्य-दालन

सजविती भक्त तिचे अंतरिच्या प्रेमें ।
शारदेच्या मंदीरांत दालनें दालनें ॥
शास्त्र, नाटय, गोष्टी, कथा, लघुही नी दीर्घ ।
निबंध-प्रबंधाचे स्वतंत्र विभाग ॥
स्फटिकाचें आहे एक दालन काव्याचें ।
देखतांचि पारणें तें फिटे नयनांचें ॥ १ ॥

महाभारताचे जनक महर्षि व्यास ।
अजुनि अजोड आहे महर्षि वाल्मिक ।
मानवांच्या कल्याणातें थोरांचें तें देणें ।
काय वर्णूं थोरी त्यांचीं काव्यभूषणें ॥ २ ॥

मराठी काव्याची श्रीअंबाजोगाईला ।
काढुनीच अर्पियेलीं मुकुंदकवींनीं ।
पाठोपाठ दासोपंत अमाप निर्मिलें ।
मंदीराच्या पाषाणांना घडिले जुडीले ॥ ३ ॥

ज्ञानदेव, मोरोपंत वाणीचे ईश्वर ।
रामदास, वामन पंडित श्लोकांचे सागर ।
ओवी, आर्या, दासबोधें मंदीर उजळे ।
काव्य पौर्णिमेचें पडलें मंदीरीं चांदणें ॥ ४ ॥

निवृत्ति नी एकनाथ तुकोबा मुक्ताई ।
नामदेव चोखामेळा गोरोबा जनाई ।
वेलपत्ति नक्षीकाम केलें अभंगांचें ।
अभंग अभंग आहेत जगाच्या अंता ते ॥ ५ ॥

प्रभाकर, होनाजी, सगनभाऊ, पठ्ठे ।
शाहिर नी लावण्यांची हंड्या नी झुंबरें ।

लोलकांत निरखीतां लावणी जादूनें ।
पिवळ्यांचि हिरवीं होतीं पिकलीं पानें ।। ६ ।।

आधुनिकांतही झाले काव्याचे भगत ।
आपआपल्या त्या परि सजविती आंत ।
फुंकिली तुतारी तीही केशवसुतानें ।
पहिलाच मानकरी मंदीर निनादें ।। ७ ।।

चंद्रशेखर, गोविंद कवि, गडकरी ।
माधवज्यूलियन्, निसर्गाचा बालकवि ।
विनायक, दत्त, तांबे, भावनाचातुरी ।
तृषार्तांना नवरस अमृत पाजिलें ।। ८ ।।

मंदीरांत ठाईं ठाई कारंजीं कारंजीं ।
भावनांचे तुषार ते नाचती नाचती ।
हृदयांत आंत खोल झराचि खळाळे ।
हृदयांच्या पाण्यावरती डुलतीं कमळें ।। ९ ।।

काव्यमंदीराच्या तेजें ज्ञानीही दीपले ।
अज्ञ ज्ञानी झाले आणि जीवनीं बहरले ।
कोकिलाला कंठ फुटे वसंताच्या चाहुलीनें ।
तैसें झालें माझें येथें मंदीराच्या दर्शनानें ।। १० ।।

●

## २. सावधान

[ लग्नांतील मंगलाष्टकें संपल्यावर वधूवरांनीं याही चार ओळी विचारांत घ्याव्या. ]

स्वप्नीं गुंगु नका तुम्ही तर अतां व्हा व्हा क्षणीं सावध ।
प्रत्यक्षांतचि सर्वही कठिण हें जाणा वधू अन् वर ।
माता तात जबाबदारि सरली आतां तुम्ही व्हा पुढें ।
जाणोनी व्यवहार पूर्ण, ढकला संसार तारूं पुढें ।। १ ।।

ध्येयें केवळ त्यांवरीच जगणें आतां असें दुष्कर ।
प्रेमा केवळ त्यांवरीच जगणें आतां असे दुर्मिळ ।

नातीं केवळ त्यांवरीच जगणें लाजीरवाणें जिणें ।
सौख्याची बरसात व्हावि तरि हें ध्यानीं तुम्ही ठेवणें ।। २ ।।

लग्नाच्या तिसऱ्या दिशींच अगदीं राहूं नका वेगळें ।
आणा ध्यानिं प्रसंग कैक पुढती तें पाळणा–बाजलें ।
वाटे कां त्यजणें अशक्य तुमचीं तुम्हां मतें वीशिचीं ।
सोडावींत कशीं तुम्हीच ठरवा ज्यांचीं मतें साठिचीं ।। ३ ।।

संसारीं मतभेद नित्य नव जे होतील ते मारक ।
काढा नित्य सुवर्णमध्य म्हणुनीं होईल तो तारक ।
लक्ष्मी ती घरची प्रसन्न असतां नाहींच कांहीं उणें ।
जाणा आंतिल खूण ही तर तुम्हां कांहींच नाहीं उणें ।। ४ ।।

सेवाधर्म महान श्रेष्ठ जगतीं तो ईशही पावतो ।
बाळे, तूं विसरूं नकोस कधिही तूझ्यांत सामावतो ।
साधी ती राहणी विचारसरणी उंची वरा, राहुं दे ।
सौख्याची फुलवात त्यागास्नेहें जीवीं तुझ्या तेवुं दे ।। ५ ।।

लग्नीं मांडव मुख्य जंक्शन असे आयुष्यमार्गी मुली ।
गाडी आणिक माणसें बदलुनी जाणे पुढें जीवनीं ।
आहे थोर प्रवास लांब परि हा घरचीच ही सोबत ।
पाहूनी दिधली अतां परततों आम्हींच संबंधित ।। ६ ।।

जमले मंडपीं आप्त सर्व घरचे तैशा तुझ्या मैत्रिणी ।
आले थोर लहान स्नेही सगळे तैशाच शेजारणी ।
देती आप्त अहेर, भेटी तुजला जी ती असे देखणी ।
देतों काव्य अहेर तुजला शब्दांची ही लावणी ।। ७ ।।

विश्वासून परस्परांवर तुम्ही संसारगाडा हांका ।
संसारीं तुमच्या वसंतचि फुलो लाभोनि शांती सुखा ।
झालें मंगल मंगलगृहीं पहा माझ्या करीं अक्षता ।
नांदा सौख्यभरें तुम्ही जगति या प्रार्थी रघूनायका ।। ८ ।।

## ३. विहीण

लेक लाडकी अतां निघाली सोडुनि अपुली आई
विहीणबाई पदरीं घ्याहो तुम्हीच आतां आई
प्रेमजलाचें सिंचन करुनि वाढविली ही वेली
तुमच्या वृक्षावरी चढविली वाढुं द्या सावली
फुलें सुगंधी फुलतील वरती परिमल भंवतालीं
तुमचीं अमुचीं घरेंही भरतील भाग्यवती ही वेली
नविन नविन ते अवघट वाटे सोडुनि जातां आई
असेच आलों तुम्ही अन् अम्ही सोडुनि अपुली आई
आठवुनी त्या आठवणींना पुण्याई घ्या पदरीं
आशिर्वाद हे सवे घेऊनि लक्ष्मी तुमच्या दारीं

●

## ४. पहिलें पाऊल

नांवहि मीं बदलिलें आतां घर माझें बदललें ।।
वरात सरली मंडोळचा सुटल्या । नयनांमधुनि धारा सुटल्या ।
माहेर माझें नेत्रीं पिउनी । हृदयिं सांठवीलें ।
आतां घर माझें बदललें ।। १ ।।

माहेर सुटलें सासरिं आलें । माझ्या घरिं मी आज पातलें ।
सुखदु:खांच्या शिवाशिवीचा । खेळ मनीं चाले ।
आतां घर माझें बदललें ।। २ ।।

बाबा आई आतां मजला । मामंजी सासूबाई ।
दीर नणंदा भाऊबहिणी । संभाळुन घ्या तुम्ही ।
आतां घर माझें बदललें ।। ३ ।।

थर थर कांपे माझी तनु ही । सुखद स्पर्श तो धीरच देई ।
सागरसरिता एक जाहली । घरची मी जाहलें ।
आतां घर माझें बदललें ।। ४ ।।

●

## ५. तुझी साउली

तूं माझा अन् तुझी साउली।
राहिन मीही निरंतरी ॥ धृ० ॥
कॉलेजांतिल मैत्री अपुली।
गोरज वेळीं संधि साधली।
नातींगोतीं साक्षि ठेविलीं।
साठेखताची झाली पूर्ती ॥ १ ॥
एकामध्यें एक मिळती।
बेरिज एकचि नको गणीती।
प्रेमराज्याच्या ह्या गमती।
गणीत चुकतें कधीं मधीं ॥ २ ॥
तूं कवी अन् मी कविता।
शाहिर तूं मी तुझी लावणी।
कशास आतां रुसणीं फुगणीं।
किती करावी मनधरणी ॥ ३ ॥
चांद माझा तुझी चांदणी।
राग माझा तुझी रागिणी।
स्वरलयमीलनिं गोड समाधी।
करणीऽऽनारायणी ॥ ४ ॥

●

## ६. सुग्रास भोजनालय

श्वशुरांचें तें पत्र वाचुनी धाडि माहेराला।
आणिक आपण निरुपायास्तव जाई खानावळीला ॥
पैसे भरुनी मेंबरशिपचे मेंबर तो झाला।
आणि जाउनी अधिरपणें तो पानावर बसला ॥
आमटिचा तो पहिला भुरका तोंडामधें अडला।
लागुन ठसका, शोधतां तया, दांत सांपडला ॥

प्रथम तयानें अपुले सगळे चांचपिले दांत ।
शाबुत पाहुन, आवाज दिधला मॅनेजरा आंत ॥
रागावून तो म्हणे तयाला ही कसली शिस्त ।
आणिक आम्ही ठेवुनि येतों तुमच्यावरि भिस्त ॥
गडबड ऐकुन बल्लवाचार्य, शीघ्र येत तेथें ।
सकाळपासून शोधित होतों सांपडला येथें ॥
दोनच दिवसांपूर्वीं बसविला अगदीं हा घट्ट ।
असें म्हणूनी उचलली दांता बसवी तो फिट्ट ॥
× × ×
तार ठोकी श्वशूरास तो दांत घशां अडला ।
धाडा लवकरि सौ. स आतां पोटोबा अडला ॥

●

## ७. मुकुंदाचा वाढदिवस

[ पतीला नांवानें हांका मारण्याच्या संवयीमुळें कधीं कधीं असा प्रसंग निर्माण होतो-- ]

लग्नानंतर प्रथमतांच त्या परस्परां दिसल्या ।
जिवलग मैत्रिणि रस्त्यांमध्यें गप्पाष्टकिं रंगल्या ॥ १ ॥
एकीनें दुसरीस विनविलें उदयिक ये बंगली ।
मुकुंदाचा वाढदिवस तो फराळास येई ॥ २ ॥
मुकुंदास कां आणिलें नाहीं पुसे मैत्रिणीला ।
सखि उत्तरली खेळामध्यें आहे रमलेला ॥ ३ ॥
रिक्त हस्तें कसेंचि जावें विचार मनि आला ।
दुसरे दिवशीं सकाळींच ती निघे खरेदीला ॥ ४ ॥
चांदीचें रिंगणें, खुळखुळा, चेंडू रबरी तो ।
सेलर सूटहि तिनें घेतला अंदाजानें तो ॥ ५ ॥
मनि तोषोनीं आतुरतेनें निघे बंगलीला ।
गळींहि पडल्या एकमेकिच्या आनंदें रमल्या ॥ ६ ॥
म्हणे, मुकुंदा दाखव आतां अधीर मी बघण्या ।
भेट आणिली मावशिनें या आनंदें रमण्या ॥ ७ ॥

भेट पाहुनी सखी क्षणभरी विस्मित ती झाली।
'अय्या' म्हणुनी खो खो, खो खो हांसत ती सुटली ॥ ८ ॥

इतुक्यांमध्यें सायकलीचा घंटीनाद आला।
थांब म्हणे, हा मुकुंद आला दाखवितें तुजला ॥ ९ ॥

मैत्रिण बोले—'गुपित सांगतें कशास खिन्न मनीं।
उपयोगी ती पडेल आम्हां सहाच महिन्यांनीं' ॥ १० ॥

●

## ८. असली नकली

विलायतेची वारी करुनी पदवीसह परतता
लग्नाच्या बाजारीं अमुचा भावही तो चढता
दर रविवारीं वधू परीक्षा अमुच्या वा वधूगृहीं
नविन वाणी नविन गाणीं नवी नवी खाणी
आई वडिलांनीं पसंत केली त्यामधुनि सून
सुविद्य सुदृढ खास पसंती पैशानें छान !
सावळी किंचित् दांत पुढे तें नाकही अपरें होतें
कुंदकळ्या अन् चाफेकळीचें स्वप्नच उरलें तें
ठाम राहुनि नकार दिधला सर्वांना सुनविलें
जन्माचा हा प्रश्न म्हणोनि सर्वां डावललें
आणि एके दिवशीं दिसली थेटरांत तरुणी
स्वरूप सुंदर बिजली जैसी स्वप्नाची राणी
काळे डोळे तेजदार ते भुवयांची धनुकली
नाके धारसे गाल गुलाबी तोंडलीं पिकलीं तीं
काळे कुंतल लांब शेपटे जरतारी गोंडे
नॉयलॉन साडींतून सळसळे ज्वानीचे झेंडे
या सर्वांवर कडी जाहली ती हंसली जेव्हां
गुलाबी पेटी मधुन चमकल्या हिरकण्याच तेव्हां
मनीं हरकलों मदनबाण तो वर्मीही बसला
हृदय थरकलें, अगदीं होतें काम मार डाला !

निश्चय करुनि नेट धरोनि किल्ला सर केला
लग्नासंमती तिची घेऊनि तिथीनिश्चय केला
दुसरे दिवशीं आणि अचानक जुने वडिलस्नेही
सहज भेटले सांगीतली मीं लग्नाची कहाणी
योगायोगानें निघाली ती त्यांच्या गांवची
कथिली त्यांनीं सर्व कहाणी तिच्या स्वरुपाची
डोळ्यांमध्यें प्लास्टिक भिगें हिरकण्या दोन नकली
नाक धार ती प्लास्टिक सर्जरी वेण्याही नकली
तोंडावरची रंगरंगोटी रुपयाच्या आंत
हुरळुन जाऊन फसु नको तुं नकली जगतांत
शुद्ध हरपली टोला अगदी वर्मींही बसला
हृदय थरकलें अगदीं अमुचा पुन्हा मार डाला !
कुणास ठाऊक आणि काय ते तिच्यामधीं नकली
परमेशाची खरी कृपा ही जागविलें वेळीं
आईवडिलांना लगे कळविलें तुम्हीच ठरवावी
तुमच्याबाहेर नव्हतों कधिही चूक सुधारावी
आणि कळलें वर्ष उलटता नॉट बॅड सावळी
नातु जुळे ते घारे गोरे आजी आज्याजवळी

●

## ९. अलंकार

अलंकार हे तुझे । कशाला । मिरविशि तूं चहूंकडे ।।
हातींपायींही चढवीले ।
रव त्यांचा जंव तव पद हालें ।
चाहुल तुझि फडफडे ।
कशाला ।। १ ।।
भूषणें तुझीं हीं खरीं ।
फिरतेस लेवुनी परी ।
आमंत्रण चोरा घरीं ।
कशाला ।। २ ।।

नथ हजाराची तुझी ।
झुलतसे ही ओठावरी ।
परि मला तिचें वावडें ।
कशाला ।। ३ ।।
दागिने तुझ्या त्या गळीं ।
तव कंठीं शोभा परी ।
मीलनास ते अडथळे ।
कशाला ।। ४ ।।

## १०. डोहाळे

कसेसेंसें बाई होतें । झाली सुंद मंद का गे ।
अंतरीच्या भावना गे । आतां उलगडी कोडें ।। १ ।।
मिचकावित ते डोळे । सखि तारका ही येते ।
हुरहुर मनिची लाडे । निशादेविला ती पुसे ।। २ ।।
काय आवडे नावडे । लाजूं नको सांग सखये ।
हृदयींचा चांदोबा गे । पुरवील कोड तुझें ।। ३ ।।
वेळ फार नाहीं उरे । हेत तुझ्या मनिचा पुरे ।
तुझ्या ओटी भास्कर आहे । बाळ तान्हें सोनियाचें ।। ४ ।।
प्रकटता उजाळील ते । दाहि दिशा तेज भरे ।
प्रकाशील माता-पितरें । उद्धरील दोन्ही कुळें ।। ५ ।।
कुलस्वामिनीच्या मायें । भाग्य आज जें लाधलें ।
मोक्षद्वार उघडी जें तें । धन्य धन्य मातृपद गे ।। ६ ।।

## ११. पाळणा

बाळा जो जो रे । मम अनिला ।
गाणीं गाउन तुजला । झुलवीते तनया ।
तव जन्मानें रे । प्यास बुझे, जीवन सफलचि झालें ।
बाळा जो जो रे ।। १ ।।

रुखरुख नऊ महिने । 'ती' कां 'तो' ।
जन्मुन कुळ उजळीलें ।। बाळा ।।
मम जननी, पिता येतां । कर ओला ।
करुनी जातील आतां ।। बाळा ।।
तव भगिनी नलिनी । दिवाळीला ।
गरज तिला ना उरली । दुसऱ्या चंद्राची ।।
प्रेमळ तुझी आजी । खूष अजी ।
बाळा लाभो तुजशीं । प्रार्थी प्रभुपाशीं ।।
तात तुझे बघती । आतां कशी ।
नेत्रीं गंमत न्यारी । बाळा जो जो रे ।।
सरस्वती लक्ष्मी । लाभोनि ।
दिगंतरा ती कीर्ती । बाळा जो जो रे ।।
राखो तुजला ती । प्रार्थी मी ।
देवी अंबाबाई । बाळा जो जो रे ।।

●

## १२. मालुनतोद

[ कवि यशवंत यांची शीर्षकाबद्दल क्षमा मागून ]

[ आईला राग काढावयास कुठें जागा नसली कीं मग मुलांवर तो राग कांहींतरी कारणानें निघतो. असाच एक प्रसंग— ]

मालुनतोद, । मी तेल ताही नाहिंद । आईद ।। धृ० ।।
पुना नाहि मी मादायाचा । लुसायचा मी नाहीं आतां ।
शांदु नतो तु बाबा आतां । मी, तेल ताही नाहिं द ।। १ ।।
थलें सांदतों थोटें नाहीं । नाहिंतल बाप्पा पापच देई ।
शांदितले तूं होतें आई । मी तेल ताही नाहिंद ।। २ ।।
बोल बोबडे ऐकुन साचे । नयन शिपल्यांतुन ओसरले ।
टपटप मोतीं अमोल मज ते । मी, तेल ताही नाहिंद ।। ३ ।।

कवटाळुनि ती चिमण्या बोले। माझा म्हणुनि तुला मारिलें।
तुला नाहिं तें कळावयाचें। मी तेल ताही नाहिंद ॥ ४ ॥

पाहुन तें हृदिं हलले कांहीं। आठवली मज माझी आई।
ओले झाले माझे नयनही। मी तेल ताही नाहिं द ॥ ५ ॥

●

## १३. प्रगति–पुस्तक

[ यांतील मूळ प्रगति प्रसिद्ध लेखक श्री. चिं. वि. जोशी यांची आहे. त्यांच्या बुद्धीचें ऋण कबूल करूनच हें प्रगति–पुस्तक रसिकापुढें सहीकरतां ठेवलें आहे. ]

(कधीं नव्हे तें पितृ–हृदय मुलांच्या अभ्यासाची चौकशी करीत असतें; आणि मग—)

सहज दिसे तें प्रगति–पुस्तक। कुतुहल तें झालें जागृत।
बघुं या तरी कुठवर प्रगति। आहे आमुच्या बाळचाची ती ॥ १ ॥

बघुनी बाळ्याचे ते गुणही। स्तिमितच झाली माझी मतिही।
गणितामध्यें शून्य भोपळा। इंग्रजींतही तसाच आवळा ॥ २ ॥

पुकारिलें मग बाळ्या आंत। जाणुन माझा नूर मनांत।
सवत्स आली सौ. ही पुढ्यांत। म्हणे, काय हें झालें आज ॥ ३ ॥

बघा ! बघा !! हे बाळ्याचे गुण। फूस तुझी ती सदैव त्यांतुन।
पास कसा हा अतां व्हायचा। ठोंब्या झाला नुसता खेळुन ॥ ४ ॥

घालुन बाळ्याला पाठीशीं। बोले मग ती वत्सलमूर्ति ;
बाळ्या जा तूं खेळायाला। थांबा थोडें स्वतः आवरा ॥ ५ ॥

× × ×

आणि बघा वर नांव वर्ष तें। प्रगति–पुस्तक कोणाचें तें।
जुन्या बाडीं त्या सहज सांपडे। आपलेंच तें लहानपणाचें ॥ ६ ॥

## १४. दोन आघाड्या

माया जगतीं खेळ खेळते । सगळें कळतें परि नच वळतें ॥ धृ. ॥
गांवाचें तें भाग्य उजळलें । मोठे नेते गांवीं उतरले ।
भाषण त्यांचें फार रंगलें । घेऊनि थैली परतच गेले ॥ १ ॥
शब्द राहिले ते नेत्यांचे । 'व्हा, व्हा, जागे, संकट मोठें ।
वाढवा वनें, थांबवा मुलें । नातरि आपण बुडतों सारे' ॥ २ ॥
कर्त्यांचें बल वाढविण्याचा । निश्चय ठरला मनीं तयाचा ॥
सांगे घरीं तो विचार मनिचा । 'सखये मजला साथ करी गे' ॥ ३ ॥
सौभाग्यवती बोले पतिला । लावा अंगणीं अपुल्या बागा ॥
घालिन पाणी मीहि तयांना । आपुल्या हातीं नाहीं पुढचें ॥ ४ ॥
मुहूर्त पाहुन एके दिवशीं । फळझाडांचीं बिजें पेरलीं ॥
व्रतस्थेची शपथ घतली । साक्ष नेत्यांचीं छायाचित्रें ॥ ५ ॥
थोरा–मोठ्या नाहिंच जमलें । कितिक ऋषींचीं भंगलीं तपें ।
साक्षात् शंकर भिल्लणीमागें । आम्हीं तर आहों त्याच्यापुढचे ॥ ६ ॥
नंतर गेले महिने कांहीं । तनुही सौ. ची सुधरत गेली ॥
अंगणिं रोपें वाढी लागलीं । पाणी घालती नित नियमानें ॥ ७ ॥

× × ×

अंगणिं अवचित दोन ढोरें । शिरतां सगळें उजाड झालें ।
प्रसूतिगृहाचा निरोप तों कळे । –सौ. ला झालें पुत्र जुळे ! ॥ ८ ॥

●

## १५. किरकोळ आणि वट्ट

[ प्रवासांत असतांना एका मोठ्या एकत्र कुटुंबांत राहण्याचा योग आला असतां घडलेला हा प्रसंग आहे. ]

भाऊ भाऊ सुखें नांदती । जावा जावा बहिणीबहिणी ।
बाळंतिणीची कायम खोली । असतें कुणि ना कुणी । खोलित ।
असतें कुणि ना कुणी ॥ १ ॥

३५६९९ ... १६७७ ... ५२१६५

मोठीं माणसें चोविस असती । शाळा-कॉलेजा चाळीस जाती ।
किरकोळांची कशास गणती । सदाच ही भरती । पाहुणे ।
सदाच ही भरती ॥ २ ॥
वडील भाऊ कर्ता घरचा । ओरडतो राक्षसासारखा ।
आंत बाहेर थोर मनाचा । दराराही मोठा । त्याचा
दराराही मोठा ॥ ३ ॥
एके दिवशीं अजबचि घडलें । सर्वही जमलीं जाणतीं मुलें ।
एकेकाला खर्चासाठीं । खर्ची महिन्याची । मिळाली ।
खर्ची महिन्याची ॥ ४ ॥
वरती हुकूम तो दादांचा । नीट खर्चा नाहिं फुकाचा ।
हिशेब ठेवा चोख तयांचा । मी तो सर्वांचा । तपाशिन ।
मी तो सर्वांचा ॥ ५ ॥
महिना सरता सर्वही जमलीं । दादाभंवतीं गिल्ला करिती ।
ताळेबंद सर्वांचाहि । होता पै न् पै । जमला ।
होता पै न् पै ॥ ६ ॥
वहीमध्यें सर्वांचें तें । खातें किरकोळीचें मोठें ।
दादांचेही डोळे मोठे । लागले सर्वांवरी । फिराया ।
लागले सर्वांवरी ॥ ७ ॥
मेघांचा गडगडाट झाला । कारट्यांनों, फसवतां मला ।
आहे शाबुत, नुसती नाहीं । ठेवण्याची खुंटी । टोपी ।
ठेवण्याची खुंटी ॥ ८ ॥
किरकोळाचा आजार मोठा । दुर्लक्ष करितां पश्चात्तापा ।
तुम्ही खर्चतां किरकोळीनें । जातें घरांतुनी । वट्टची ।
जातें घरांतुनी ॥ ९ ॥

●

## १६. मी, मनी व पोर

मी माझ्या मनीची कथा सांगतों जनां ।
मज लळा लाविला काबिज केलें मना ॥
कधीं उशीर जर मला घरीं परतण्या झाला ।
मनी खिन्न गांठते येऊन दारीं मला ।

झोपेंत रात्रिही कधीं न सोडी मला ।
गुरगूर सदाची लगटुन झोंपे मला ।
३ क्वचितच जीवन तें, बहरलें ।
मनीं आशांकुरही ते, लहरले ।
तिज दिलें हवें तें चोज, पुरविलें ।
अदृश्य जाहली एके दिवशीं मला ।
परतुनीच येतां घेउनि आली पिलां ।। १ ।।
आणि पोर जाहलें थोडें मोठें जधीं ।
गुण नवीनही तो कळला मनिचा तधीं ।
शिकविते ही जीवन श्रीगणेशा पिलां ।
जाणीव असतसे कर्तव्याची तिला ।
कधि हट्ट पिलाला येई, तों मनी ।
कधि रुसुनिही ते बसलें, तों मनी ।
कधि सदा खेळतां रमलें तों मनी ।
गर्जून उठे ती धुसफुस मग जी चाले ।
पाहतांच चिमणे काळिज जें थरथरतें ।। २ ।।
भडकतां मनी मग आवाज तोही चढे ।
गोडवा आवाजामधील मजला नडे ।
पाठांचा मग तो गोंधळ चाले मनीं ।
चुकतेंचि सारखें शिकलेलें विसरुनि ।
टकळी ही चालें वेगें, सारखी ।
बॅटही हाताची फिरते, मधुनिही ।
हितचिंतन परि मनी करते, सारखी ।
नख–अग्र–तीक्ष्णता कधीं न बोचे पिलां ।
मायेचि थापड दिन आठवले मला ।। ३ ।।

●

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वि: क्रमांक नों: दि:

## १७. ताई आणि भाऊ

[ आई-वडिलांचें मागें भावाच्या संसारांत बहिणीची पुष्कळवेळां अडचण भासते. अशावेळीं-]

नको रे बोलूं तूं विनवी बहीण।
दोन दिवसांचि मी आहे सोबतीण॥
तुझ्या रे संसारीं फुलला वसंत।
वहिनी माझी आहे मला रे पंसत॥
आई-बाबा मागें वाढविलीं प्रेमें।
भाऊ तूं कालचा आज कां असा रे।!
घर तुझें तुला, असो लखलाभ।
माझ्या मी दैवाची मला नाहीं लोभ॥
सोय पहा आतां तुझी नि माझी रे।
बांध काळी पोत माझ्या तूं गळा रे॥
तुझ्या तूं घरीं रे माझ्या मी घरीं रे।
येशील ना भाऊबिजेला घरीं रे॥
एका मायेपोटीं जन्मलों आपण।
संभाळ ताईला आईचीच आण॥

●

## १८. सुखांतिका कीं !

संसाराचे रंगभूमिवर, हिरो हिरॉइन तूं अन् मी।
अंकामागुनि अंक परी, सुखांतिका कीं–नको कल्पना॥

स्वयंपाकगृह, माजघर अन् बैठकीची खोली अन् गच्ची।
सर्व समावें अपुल्या खोलित, भाग्यवंत परि तीहि मिळाली॥

मला वाटतें सवड काढुनि, घ्यावी सुंदर पातळ जोडी।
तुझा हट्ट कीं मलाच घ्यावी छानदार धोतरजोडी॥

मी राबतों बाहेरीं अन्, तूं कष्टशी सदनांतरीं।
परि पुरेना बेत आंखले शक्य ते नानापरी॥

रुचिपालट तो विड्या ओढुनि, सोडुनि सिगरेटीची गोडी।
चहाही दुसरा सकाळचा तो, बंदच आतां कपातखातीं ॥
धुणिं भांडीं हीं घरीं घेतलिस माझिच तूंही अर्धांगी।
परिस्थितीनें हतबल झालों, तुझ्या कवतुका अंतरलों मी ॥
दिवाळी, दसरे आणि पाडवे, डोळीं आसवें वरि वरि हंसणें।
विधात्यास त्या काय तयाचें, प्रेक्षक शेजारी ते फुकटे ॥
बाळें चिमणी आपुलीं देतीं उत्साहाचा झरा सदा।
सहारामधे एक आसरा आशेचा गारवा सदा ॥
दैवीं अपुल्या अनिश्चितता तुझा नि माझा नसे गुन्हा।
अंकामागुनि अंक परी, सुखांतिका कीं—नको कल्पना ॥

●

## १९. प्रतीक्षा

कां ! आला नाहीं, जागी सारी रात।

अजुनी का ते नाहीं सरले। विरहाचे दिन का तुम्ही फिरले।
केली तयारी मीलनाची। तुम्ही आला नाहीं
जागी सारी रात।

शशि बाहेरी उजळित होता। शांती होती अवघ्या जगता।
लखलखलेल्या महालीं हृदयीं। माझ्या अंधार न् अंधार।
जागी सारी रात ॥

रात्र सरली उषा बिलगली। तुमची गाडी अशि कशि चुकली।
नाहीं नाहीं तें मनांत येतें। तुम्ही आला नाहीं ॥
जागी सारी रात ॥

कुणि तरी आलें अश्रु पळाले। मी बावरलें कुणिं सांवरलें।
आम्ही नाहिं जा, खोटें कुठले। तुम्ही आला का नाहीं।
जागी सारी रात ॥

●

## २० अंगाई

नीज आतां नीज बाळा ।।
गातें मी ही अंगाई ।

अर्ध्यावरती सोडुनि गेले ।
दैव आपुलें अडवें आलें ।
आतां माझी सत्ता सरली ।
मोलकरिण मी घरची बनलें ।। १ ।।

रजनी माझें नांव ठेविलें ।
प्रकाश गेला रजनी उरलें ।
घरांत आतां रुष्टचि सगळे ।
पांढरपायी मीही ठरलें ।। २ ।।

आड विहिर ती जवळ करावी ।
अथवा खावी अफुची गोळी ।
अपराध तुझा काय म्हणोनी ।
फिरतें पाउल परि माघारीं ।। ३ ।।

तुझिया नजरे नजर भिडवितां ।
प्रकाश दिसतो मजला आतां ।
कुंपण करुनी तुझिया रोपा ।
वाढवीन मी प्रभुही त्राता ।। ४ ।।

जरि काळोखी मी वावरतें ।
आतां नच मी लव घाबरतें ।
मातेच्या धर्मास जागतें ।
नीज अतां तूं निश्‍चिंतें ।। ५ ।।

१४०८४

## २१. हार

[ जगांत हाच अनुभव येणाऱ्यांची संख्या जास्त असते. ]

तीस वर्षें झुंज झाली ।
दैव आणि उद्योगांची ।
हार माझी ध्येयें माझीं ।
स्वप्नें ठरलीं जीविताचीं ॥ १ ॥

आदर्श ठेविले जे जे झाले ।
सामान्यांतुनि असामान्य ते ।
सरड्याची ती धांव ठरली ।
मर्यादा ही कुंपणांची ॥ २ ॥

आप्तेष्टांची पर्वा नव्हती ।
नाहिं ऐकिलें मातापितरें ।
जीत तयांची, प्रयोगामधें ।
आयू सरलें निम्में पुरतें ॥ ३ ॥

झालें गेलें गंगेस मिळालें ।
निश्चय ठरला आतां मनीं ।
सामान्यांतचि अमुची गणती ।
हमालि आतां प्रतिदिनीं ॥ ४ ॥

●

## २२. अजून जायचें दूर

अजुन जायचें दूर गडे ।
अजुन जायचें दूर ॥

अपयशाचें वारें सुटलें ।
निराश घन ते अंबरीं जमले ।

दैवी चपला वरती कडके ।
आश्रयतरु तडके, तडके, तडके । गडे—

नेमें दीपावलि ती येते ।
स्नेह न आपुल्या पणतीपुरतें ।
अंधारांतच मूकपणानें ।
सोसावे चटके, चटके, चटके । गडे—

निराश होता मार्गी बसणें ।
आधाराविण कसे चालणें ।
कशास आतां मागें वळणें
चल पाहूं पुढतें, पुढतें, पुढतें । गडे—

दूरवर तारा लुकलुकते ।
मधुनी दिसते पुन्हां हरपते ।
धडपडण्याला कांहि तरी तें ।
चल जाऊं पुढतें, पुढतें, पुढतें । गडे—

संग्रामांतच जयश्री वसे ।
घावावांचुन देवकळा कुठें ।
नव्या प्रभातीं नवे किरण ते ।
चल फुटलें तांबडें, तांबडें, तांबडें । गडे—

## २३. भवानि, तारि तारि

भवानि, तारि तारि मजला ।
भवसागर हा अथांग भरला ।
नजर न पोंचे पैलतिराला ।
मधेंच बुडतो आई आतां ।
तारि तूं मजला, मजला, मजला ॥ १ ॥

शक्तिदेवते मांगलेश्वरी ।
जगन्माते करविरवासिनी ।
नमितो तुझिया चरणालागुनि ।
तारि तूं मजला, मजला, मजला ॥ २ ॥

मंदमति मी अज्ञ लेकरूं।
माझी माता नारायणि तूं।
धांव पाव गे आई आतां।
तारि तूं मजला, मजला, मजला ॥ ३ ॥

## २४. जुन्या घराला विसरुं नको

नव्या दमाच्या नवीन युवका। मार भरारी अफाट दुनिया।
जोडीदारिण तुजला दिधली। सुखदुःखाला तुझी साउली।
जुन्या घराला विसरुं नको ॥ १ ॥

नव्या युगाची कल्पना नवी। नवीन नातीं नवे सोबती।
नवेंही घरकुल उभार जगती। जुन्यांतूनि ही उत्पत्ति नवी।
जुन्या घरकुला विसरुं नको ॥ २ ॥

होतें जें तें तुजला दिधलें। विद्या धन अन् संस्कृतिला।
शिदोरीच ही मार्गावरती। पुरेल तुजला अखेरीवरी।
जुन्या घरा परि विसरुं नको ॥ ३ ॥

रोपांतुन हा वृक्ष जाहला। खांद्या आतां त्या बळकटल्या।
वादळाची क्षिती कशाला। उन्नत राहिल आतां माथा।
मुळास धक्का देऊं नको ॥ ४ ॥

पिकलें पान पडावयाचें। कोंब नविन ते फुटावयाचे।
जुनें जाउनी नविन यायचें। रहाटगाडें फिरावयाचें।
जुन्यास परि तूं विसरुं नको ॥ ५ ॥

पूर्वजांच्या पुण्याईला। मातृदुग्धा जागुन युवका।
कुलस्वामिला स्मरून वागा। उणें काय मग कल्याणाला।
जुन्या माणसा विसरुं नको ॥ ६ ॥

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ... ३७६९९ ... दि: ... १६७० ... नों. दि. ५।२।६५

## २५. पन्नाशीची झुळुक

कुणि नाहीं कुणि नाहीं । जगांत आपुलें नाहीं ।।
तुझे आई बाबा सुटले । माझे मजला अंतरले ।
भाऊ बहिणी तुझ्या नि माझ्या । आपआपल्या दंग मनीं ।
कुणी कुणाचें नाहीं ।। १ ।।

पुत्र आपुले मोठे छोटे । आशेनें केले मोठे ।
त्यांना फुटले पंख मतांचे । गेले ते उडुनी आतां ।
रमवाया अपुल्या जीवा ।। २ ।।

कन्या ह्या तर दुसऱ्याच्या । जाती अपुल्या घराघरां ।
मानपान अन् सुरती हुंडा । मनधरणी ती वरी सदा ।
सासर तृप्त न होइ कदा ।। ३ ।।

बाल्याच्या त्या तुझ्या मैत्रिणी । आजवरचे माझे स्नेही ।
नातींगोतीं तुझीं नि माझीं । भुललीं सारीं स्वार्थाला ।
स्नेह राहिला स्मरणाला ।। ४ ।।

रक्ताचें नातें तुटतें । शेजारी ते मग कसले ।
गंमत बघण्या मना रमविण्या । जमती आजूबाजूला ।
फजिती अपुलि बघण्याला ।। ५ ।।

साथी आपण संसारीं । टिकलों आजवरी परी ।
येइल काळाचि ललकारी । कुणा कळेना कोण पुढें ।
आतां जायचें मागें पुढें ।। ६ ।।

शाश्वत साथ जयानें दिधली । क्षणभंगुर या संसारीं ।
जो आश्वासी सर्व प्रसंगीं । तो प्रभु अपुला साथि खरा ।
मरणांतीं ना सोडी कुणा ।। ७ ।।

●

## २६. दिवाळी

दिवाळी दिवाळी आली, हासत नाचत खेळत आली
दिवाळी दिवाळी आली
हासत नाचत दारी आली दिवाळी दिवाळी आली ।। धृ. ।।

अंगणांतुनी सडे शिंपिले रांगोळ्यांनीं अंगण भरलें
घराघरांतुनी दीप उजळिले घरें उजळलिं मनें उजळलीं
हासत नाचत आली आली दिवाळी दिवाळी आली ।। १ ।।
सुप्रभातीं मंगलस्नानें नटुनि जाती देवदर्शनें
आहाराचे परोपरीचे मुलें बहरली जीव बहरला
हासत नाचत आली आली दिवाळी दिवाळी आली ।। २ ।।
ओवाळणी ती पाडव्याची आणि बिजेच्या मांगल्याची
रुसणीं फुगणीं आज सरती ताम्हनांतल्या निराजनांतुन
नेत्रीं हासत आली आली दिवाळी दिवाळी आली ।। ३ ।।

## २७. सांगणें आणि मागणें

जगताचीं तीं भव्य स्वरुपें तव स्वरुपाचा भास ।
अन्याय जुलुम ते पाहुन वाटे भासचि तो आभास ।
प्रभुजी । भासच तो आभास ।। १ ।।
" नशिबाचे ते भोग भोगणें " अपुल्या का हातीं ।
समाधान गुटिका उगळुनि मायें त्या पाजिती ।
देवा । मायें त्या पाजिती ।। २ ।।
दैव घडविता हिशेब धरिसी गतजन्माचा का ।
कायापालट झाला तरिही वसुलीचा हेका ।
देवा । शोभे तुजला का ।। ३ ।।
फत्तर द्रवण्याची करुणता उद्भवते जेव्हां ।
चक्रवाढिनें वसुली चालली मज गमते तेव्हां ।
देवा । मज गमते तेव्हां ।। ४ ।।
गतजन्माचें देणें घेणें मजला नाठवतें ।
स्मरण वह्या त्या आम्हां न दिधल्या ।
प्रभूजी आठव ते । देवा । स्मरण न का तुज ते ।। ५ ।।
आम्हां पामरा मुळीं न समजे हिशेब हे असले ।
त्रैलोक्यपती स्वतः म्हणविसी वर्तन हें कसलें ।
प्रभुजी । वर्तन हें कसलें ।। ६ ।।

माझ्या मनिंचे सगळे दुखणें ऐकविलें तुजला ।
आतां आंतले खास मागणें सुनवीतों तुजला ।
प्रभुजी । सुनवीतों तुजला ।। ७ ।।
देण्याला तूं समर्थ स्वामी तुझाच तो अधिकार ।
घेण्याला मी सदैव आहे आसुसलेला फार ।
प्रभुजी । आसुसलेला फार ।। ८ ।।
पुरा करोनि हिशेब घ्यावा ज्या त्या जन्माला ।
देणीं घेणीं मुळीं न ठेवा पुढच्या जन्माला ।
प्रभूजी । पुढच्या जन्माला ।। ९ ।।
केल्या कर्मा फळें भोगतां दूषण ना दैवा ।
सन्मार्गाला स्वयें लागतिल भूषण हें तुम्हां ।
देवा । भूषण हें तुम्हां ।। १० ।।
पैलथडीच्या मोक्षासाठीं कशास मग झुरणें ।
जो न समजतो अज्ञजनांना अंधारीं फिरणें ।
देवा । अंधारीं फिरणें ।। ११ ।।
ऐलथडीची मोक्षप्राप्ति करुनी अनुभवुनी ।
जीवितकार्या पुरे करोनि येतिल तव भवनीं ।
देवा । येऊं तव भवनीं ।। १२ ।।
पुनश्च जन्मोत्सव जरि असला कशास तें भ्यावें ।
पुनश्च हरि:ओम् म्हणोनी कायेला ल्यावें ।
देवा । देशिल ते घ्यावें ।। १३ ।।
बा परमेशा, चुकलें मुकलें संभाळुन घ्यावें ।
अवर्षणीं मग वसंत फुलवुनि प्रेमें तूं द्यावें ।
आम्ही भक्तीनें घ्यावें ।। १४ ।।

●

## २८. भैरवी

साठि उलटली जीव उबगला ।
नजर लागली पैलतिरा ।
निरोप द्याहो मजला आतां ।
अर्थ समजला पुरा खरा ।। १ ।।

स्वार्थ सुटला पंछि उडाला ।
गोडी स्वातंत्र्याची कळली ।
काय तमा त्या घरदारांची ।
पुत्रपौत्र वा त्या आप्तांची ।। २ ।।
संसाराच्या सुखदुःखाच्या ।
प्रश्नपत्रिका लिहिल्या ज्या त्या ।
निकाल होतां कळे निकाला ।
उत्सुक मी त्या दैवि क्षणाला ।। ३ ।।
ध्यास अतां मज प्रभुचरणांचा ।
अन्य मार्ग मज नलगे कांहीं ।
आत्मा मग हा अधीर झाला ।
घेउनि जा प्रभु तव नगरीला ।। ४ ।।

●

## २९. घेउनि जा मज

रघुवंशाचे ब्रीद राखितां ।
जातां वनीं मज घेउनि जा ना ।।
तव नशिबाची भागी राघवा ।
अधिकारानें धर्मपत्निच्या ।।
भोगिन वाटा सर्वे आघवा ।
घेउनि जा मज वनीं राघवा ।।१।।

पतिविण स्त्रीला राजमंदिरें ।
कशास किंवा शालु भूषणें ।।
रुचतिल तिजला कशीं मिष्टान्नें ।
जीव शिवाविण जगेल कैसा ।।२।।

पतिविण स्त्रीला स्वर्ग नरक तो ।
पतिसह स्त्रीला नरक स्वर्ग हो ।।
परमेश्वर तिज दुजा नको तो ।
पतिपूजेनें जाइल मोक्षा ।।३।।

देव दानव मानवांची ।
कशास भीति हिंस्र पशूंची ।
तुझ्या आश्रया मी निश्चिती ।
राहिन दुर्दम निबिड वनीं ।।४।।

कंदमुळें मी चाखिन गोडी ।
वल्कलेंहि नेशीन आवडीं ।
फिरेन तुजसह युगायुगांतरी ।
या चौदांची भीति कशाला ।।५।।

## ३०. महाकवीस सवाल

तूप पोळिवर अपुल्या पडतें कशास मग पर्वा ।
उपेक्षितांच्या हृदयांची बा कोण करी पर्वा ।।
न्याय नियम हे कलीयुगांतील नव्हते कां ठावे ।
रामायणिं उर्मिला उपेक्षुन कलियुग कां केलें ।।
सवें जानकी रघुरायाच्या होती वनवासा ।
देवि उर्मिला मुके कशी मग पतिच्या सहवासा ।।
सधवा विधवा देवि उर्मिला विरहावस्था कां ? ।
दंड कशाचा लक्ष्मणाही विधुरावस्था कां ? ।।
एक दोन ना चवदा वर्षें कंठाया काळा ।
गुलाबी पत्रांची ती नव्हती सोयच त्या काळा ।।
जागेची कां टंचाई ती होती वनिं वाल्मिका ।
म्हणुनि ठेविली देवि उर्मिला श्वशुरगृहि ती कां ।।
रिझवायाला जवळी नव्हती पतिची पडछाया ।
काय सांगुनी तिला ठकविलें तुम्हीं रघुराया ।।
महाकवी भास्करास केला प्रश्न काजव्यानें ।
भ्यावें शंका पुसावयाला कां विद्यार्थ्यानें ।।

## ३१. कांचनपुरी

काय आणिली भेट सुदामा ?
काढ काढ रे सत्वरि आतां ।
आतुर तो श्रीहरी। पुशितसे ।
आतुर तो श्रीहरी ।। धृ० ।।
हात घालुनी काढुन घेई ।
खाकेंतिल ती चिंध्यांची जुडी ।
काढुनि पोहे पुरचुंडींतुनि ।
फक्के मारी सुके सुखानें ।
धांवली ती रुक्मिणी । मागे ।
अर्ध्याची वाटणी ।। १ ।।
सुदाम बोले येतो श्रीहरी ।
लोभ असू द्या असाच मजवरी ।।
मनीं तोषोनि घरीं परतसे ।
नवल देखिलें सुदामदेवें ।
देखिली कांचनपुरी । हरीनें ।
अुभविली सुदामपुरीं ।। २ ।।

●

## ३२. होरी

कुंजवनामध्यें राणा नंदराणः ।
होरी खेळे गिरिधारी ।।
गोप-गोपिका जमल्या साऱ्या ।
रंग खेळे गिरिधारी । गिरिधारी । होरी खेळे गिरिधारी
साडी चोळी भिजली सारी ।
मारुं नको पिचकारी । पिचकारी । होरी खेळे गिरिधारी
रंग रंगला-सर्व रंगले ।
वेळ किती हा झाला कान्हा । आतां मारुं नको पिचकारी
आम्ही गोपिका सासुरवाशिणी
जाऊंदे आतां घरीं बाई । कान्हा अरे । मारं नको पिचकारी ।।

●

## ३३. नर्तिका

छुम् छुम् छुम् छुम् नाद।
पदीं घुंगरांचा बिजली ही चमके। चमके ॥ धृ० ॥

लयकारीमधिं नादही फिरतो।
बोले तोही मृदुंग तिथ्ये ॥ १ ॥

थयथय नाचति तव पदकमलें।
नृत्यकलेची सम साधते ॥ २ ॥

नृत्य संगीत मीलन करुनी।
श्रीखंडचि बनतें मधुर तें ॥ ३ ॥

स्वतः रंगूनी रसिका झुलवुनि।
स्वार्था तूं साधिशी नर्तिके ॥ ४ ॥

त्रिभुवनस्वामी भोळा शंकर।
भिल्लिणी का भुलला।
मज कळें ॥ ५ ॥

## ३४. हिची कहाणी

तव सहवासीं मी धुंदचि होतें राया।
कां घटस्फोट मग कुठली दुसरी बया ॥ धृ० ॥

तव हृदयीं अंतरीं असती नाना कळा।
परित्यक्त हृदयींच्या कळतील कैशा कळा।
मम सहवासीं तूं सुखदुःखें चाखिलीं।
विसरशी अतां कां प्रीती तव गोठली।
कां अंतरली तव सेवा। सांग ना।
कधीं रुसुनी मी बसलें। सांग ना।
कधिं केला का कंटाळा। सांग ना।
मी झिजवुन काया तुवा तोषिलें राया।
कां घटस्फोट मग कुठली दुसरी बया ॥ १ ॥

मम तारुण्यांतील दिवस आतां संपले ।
तव जीवन अजुनी फार पुढें हें कळें ।
कर दुसरी आतां मुळींही मी ना रडे ।
पाहिजे कुणि तरी मला कळे तव अडे ;
शेवटचा आतां घांस । भरवि तूं ।
शेवटची काडी आतां । लाव तूं ।
मम अस्थी मग ठेवी । जपुनि तूं ;
घे हांसत हाता ओढी तूं मज राया ।
मी तुझीच 'पाइप' तुला सोडिते राया ॥ २ ॥

●

## ३५. सावित्रीची कहाणी

वसंत येतां आम्रफलें जशि चोखाया मिळतीं ।
व्याख्यानांतुन मुक्ताफळेंहि चाखाया मिळतीं ॥ १ ॥
भारती संस्कृति विषयही फार जिव्हाळ्याचा ।
अभ्यासही तो व्याख्यातीचा मोठा विषयाचा ॥ २ ॥
निरनिराळीं जुनीं पुराणीं उदाहरणें देई ।
नवा अर्थ तो काढुन त्यांतुन श्रोत्यांना पटवी ॥ ३ ॥
उच्च संस्कृति उच्च कल्पना काळामधें विरल्या ।
आपण आतां कुठें परंतू-बाई गहिंवरल्या ॥ ४ ॥
सावित्रीची थोर कहाणी यमास हरविलें ।
जन्मोजन्मीं पति लाधण्या व्रत आपणा दिधलें ॥ ५ ॥
अन्याय असे हा 'एक ओरडे' 'पुरुषावरती हा' ।
स्फोट उडाला सभेमाजि त्या-बाई गडबडल्या ॥ ६ ॥
मारकी नजर ती धुंडी शोधी आवाज ओळखिचा ।
पति-पत्नीची नजर भेटतां-बाई गडगडल्या ॥ ७ ॥

*　　*　　*

बारिक वार्ता कानीं आली-धमसत राहे सभास्फोट तो ।
विचार करुनी दोघांनीही पुढें घेतला घटस्फोट तो ॥ ८ ॥

●

## ३६. बेकाराचें प्रेमगीत

[ कवि कुसुमाग्रज यांची क्षमा मागून--- ]

दिनामागुनी चालले मासही गे ।
करावी किती लाडके वंचना ।
किती काळ कक्षेंत धावूं तुझ्या मी ।
कितीदां करूं ती तुझी याचना ॥ १ ॥

तुवा फेंकलेले कुठे वृत्तसृष्टींत ।
वेचूनिया दिव्य संदेश ते ।
तुला मोहवाया कशी रांग लागे ।
तपाचार स्वीकारुनी दारुण ॥ २ ॥

दिमाखांत सारे नटोनी थटोनी ।
दारीं तुझ्या सर्व उभेचि गे ।
परंतू तुझ्या मूर्तिवांचून आतां ।
मला वाटतें विश्व अंधारलें ॥ ३ ॥

स्त्रियांच्या नकारांत होकार येतो ।
संकेत गेला कुठे तो अतां ।
तुझ्या दूरतेनेंचि अर्धाचि झालों ।
किती काळ साहूं अतां यातना ॥ ४ ॥

तुझें नित्य सान्निध्य लाभेल जेव्हां ।
बहारून येईल सर्वस्वची गे ।
तुझ्या निश्चितीनें मला सर्व तेव्हां ।
संसार हा रम्य वाटेल गे ॥ ५ ॥

●

## ३७. कलेस

हिरकणी जातीची आनंदखनी ।।
कांती अंगीं संधिकाळची ।
शालुस किनारी इन्द्रधनूची ।
वरती जाळी नक्षत्रांची ।
बरसतें चांदणें तव नयनीं ।। १ ।।
अखंड तारुण्याची मस्ती ।
अधरपानें अमृतप्राप्ती ।
मादकतेची सदाच सुस्ती ।
तृप्तीं सदाही ती मुक्ति ।। २ ।।
जातियता तर तुझ्या न गांवीं ।
रावरंकता तुला न ठावीं ।
वशिलेबाजिस तूं नच भाळी ।
केवा न तुला सौंदर्याची ।। ३ ।।
तुझ्या कटाक्षें धन्य व्हावया ।
दारुण तपस्या हवीच व्हाया ।
प्रसन्न होता सहज समाधी ।
मरणांत सजविता तव करणी ।। ४ ।।

## ३८ पृथ्वीचा पट

पृथ्विचा पटचि मांडियला ।
प्रकाशा ग्रहचि टांगियले ।
जिवांच्या सोंगट्या केल्या ।
खेळती देव हौसेनें ।। १ ।।
घडविले फासे दैवाचे ।
घडविती दैव प्राण्यांचें ।
कुणाला दान भाग्याचें ।
कुणाला भाग्य करटीचें ।। २ ।।

जिवांच्या जीवाचा खेळ ।
खेळति देव मौजेनें ।
फावल्या वेळेचा मेळ ।
घालती थोर हौसेनें ॥ ३ ॥

वृथाची अहंकार अपणा ।
म्हणे मीं असें तसें केलें ।
सोंगट्या त्या पटावरल्या ।
चालती दानांचे गतिनें ।

कुणी मारी बढाई ती ।
आम्ही तें असेंचि करणार ।
कुणाला ठाउके पुढती ।
कसे तें दान पडणार ॥ ५ ॥

## ३९. दुःखापोटीं

दुःखापोटीं सुख जन्मतें । दुःखावरती जग हें जगतें ॥ धृ. ॥

गुंडगिरींतुन वाल्मिकी झाले ।
रामायण देते झाले ।
षंढत्वांतुन गीतामृत तें ।
भगवानांनीं जगतां दिधलें ॥ १ ॥

पत्नीविरहांतून जन्मला ।
बादशहाचा ताजमहाल ।
प्रेम सौंदर्याचा लाभे ।
भारताला अजोड महाल ॥ २ ॥

लग्नमंडपीं दुःखी सर्वा ।
टाकुनि गेले रामदास ते ।
मना बोधिले दासबोधें ।
उद्धरिले जन प्रपंचि रत ते ॥ ३ ॥

पितृप्रेमा आंचवल्यानें ।
ध्रुवबाळाचें अढळ स्थान ।
प्रसूतिवेदना नारीजगता ।
देती मातृत्वाचें निधान ॥ ४ ॥
दुःखाश्रूंतुन माणुसकीची ।
निर्मिति घडते वारंवार ।
दुःखी मानवा परमेश्वराचा ।
आठव घडतो वारंवार ॥ ५ ॥

## ४०. कशाविना काय नाहीं ?

नादाविना सूर नाहीं । सुराशिवाय तान नाहीं ॥
घुंगरुविना नृत्य नाही । बाईविना लावणी नाहीं ॥ १ ॥
गंधाशिवाय वास नाहीं । दुर्गंधिविना किळस नाहीं ॥
क्षाराशिवाय रस नाहीं । रसाशिवाय चव नाहीं ॥ २ ॥
आकाराविना रूप नाहीं । लज्जेशिवाय बाई नाहीं ॥
राधेशिवाय श्याम नाहीं । सीतेशिवाय राम नाहीं ॥ ३ ॥
विनोदाविन हास्य नाहीं । संघर्षविना क्रोध नाहीं ॥
क्रोधाशिवाय त्वेष नाहीं । दुःखाशिवाय क्लेश नाहीं ॥ ४ ॥
क्लेशाशिवाय रड नाहीं । मायेशिवाय कढ नाहीं ॥
स्नेहाशिवाय प्रीति नाहीं । धाकाशिवाय भीति नाहीं ॥ ५ ॥
प्रलयाविना रौद्र नाहीं । बलिदानाविना क्रांति नाहीं ॥
अंमलाशिवाय नशा नाहीं । निशाशिवाय उषा नाहीं ॥ ६ ॥
अन्नाशिवाय शक्ति नाहीं । तृष्णेशिवाय तृप्ति नाहीं ॥
श्रद्धेशिवाय भक्ति नाहीं । तपाशिवाय सिद्धी नाहीं ॥ ७ ॥
कांटयाशिवाय गुलाब नाहीं । कपडयाविना रुबाब नाहीं ॥
विद्येशिवाय विनय नाहीं । त्यागाशिवाय शांती नाहीं ॥ ८ ॥
शिवाशिवाय जीव नाहीं । नाही विना आहे नाहीं ॥
सर्वांविना जग नाहीं । तुम्ही नाहीं नि आम्ही नाहीं ॥ ९ ॥

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
वि:
नों दि:

## ४१. पुण्याची गम्मत जम्मत

ऐका पुण्याची तारीफ। गमती जमती नगरांत ।। धृ. ।।

पर्वतीच्या पार्वतीला चोरांनीं पळविली।
शंकराच्या मांडीवरती दुसरीला बसविली।
सुवर्णाच्या गुणाची ती होती पहिली गुणवंती।
भोळा म्हणुनि संभाळीली पहिलीची सर नाहीं ।। १ ।।
गजानन तळ्यांतला तळ्याविणें राहिला।
जंगली महाराजांचा संपला निवास जंगलाचा।
दाढीवाल्या दत्ताची ती दाढी कुठें हरवली।
भांग्या मारुतीची भांग आतां पार उतरली ।। २ ।।
नारदानें वामनबटुनें वस्ती केली पुण्यभूमि।
जगामधें दुसरी त्यांना जागा नाहीं सांपडली।
सदावर्त्या रामाच्याही बिऱ्हाडाची झाली बदली।
विनायकें लक्ष्मीपथीं थोडी जागा बदलली ।। ३ ।।
बेलबागेमध्यें तुळशी, तुळशीबागेचा बाजार।
बायकांनीं करावयाचा संसाराचा तो बाजार।
निवडुंग्या विठोबा अन उपाशी विठोबा।
पांडुरंगा तुम्हीच रहावें—अमुचा पहिला पोटोबा ।। ४ ।।
खजिन्याच्या विहीरीवरती ओतून पैसा खजिना—महाल।
मुलें खेळतीं शिवरायाचा होता जेथें लालमहाल।
शनवारवाड्यापुढें गर्जती वक्ते नेते सभांतुनी।
महाराष्ट्राचें राजकारण अजुन चालतें पुण्यांतुनी ।। ५ ।।
स्त्री-पुरुषांना समान अधिकार फुले मंडई आघाडीवरी।
अलकापाशीं पनघट घेउनि निघाली नारी नदीवरी।
जागजागीं गिरण्या आहेत चालताती विजेवरी।
एक चाले कपड्यांची अन् बाकी सगळ्या पिठावरी ।। ६ ।।
एंप्रेस बागेमधें आहेत तऱ्हेतऱ्हेची झाडें, फुलें।
नू. म. वि. मध्यें चोपन्न तुकड्या अडीच हजारावरी मुलें।

विद्यार्थि-विद्यार्थिनींचि निम्मी आहे वस्ती ती ।
अनाथ विद्यार्थि गृहामधें सोय लागते गरिबांची ।। ७ ।।

कीर्तनशाळा, शिवणशाळा, संगीतशाळा, धंदेशाळा ।
शाळाकॉलेजा भरीला क्लास आहेत ते नाना ।
मुलें मुली अन् आईबापही शिकती दिवसां रात्रौही ।
सेवासदनीं सोय सर्वही आजीहि शिकते पुण्यांतली ।। ८ ।।

मंगल कार्यालयामध्यें कार्यें घडति शेकड्यांनीं ।
नवरा बाहेर गांवाचा अन् नवरीही बाहेरगांवची ।
बँड धंद्यामधें उगडली नवी आघाडी 'प्रभात'नें ।
वतनदारा बसला धक्का यशस्वि झालें नवतरणें ।। ९ ।।

पुणेरी मिसळ, पुणेरी टांगा, सायकल स्वारी ती न्यारी ।
धोतरावरी हॅट दिसे ही फॅशन नगराची न्यारी ।
पुणेरी जोडा, पुणेरी पगडी आतां नाहीं दिसायची ।
जोडा राखिला अहेराला डोकीं शाबुत पुण्यांतलीं ।। १० ।।

महाराष्ट्राच्या छत्रपतींची बुद्धिसागर नानांची ।
शि. म. परांजप्यांची अन् गोखले चिपळुणकरांची ।
ज्योतिबा फुल्यांचि अन् सुधारकाग्रणि आगरकरांची ।
या सर्वांची पुण्यभूमी कर्मभूमी पुण्याची ।। ११ ।।

लोकमान्य टिळकांची अन् वेदमूर्ति राजवाड्यांची ।
साहित्याच्या सम्राटाची, महर्षि अण्णा कर्व्यांची ।
तपोभूमी, कर्मभूमी, पुण्यभूमी पुण्याची ।
अत्रे, पत्रें चालविती तें पाणी, वाणी पुण्याची ।। १२ ।।

वसंत व्याख्यान माला त्याचें ज्ञानसत्र तें आगळें ।
प्रसिद्ध गणपति--उत्सव त्याचें स्वरूप सगळें वेगळें ।
किल्ल्यांची रांगोळ्याची गालीच्यांची मजा बघा ।
सांगुन नाहीं कळावयाची पुण्यास येऊन ऐका, बघा ।। १३ ।।

सभा संमेलनीं उत्सवीं पुणेरी गप्पा गमतीच्या ।
कथा-गाण्यामधें उमटतो पुणेरी किस्सा जमतीचा ।
या सर्वांच्यामधुन चमकते बुद्धीची ती परंपरा ।
अजुनी आहे राखलेली पुण्यानें ती परंपरा ॥ १४ ॥

●

## ४२. स्वातंत्र्योत्तर दिवाळी

पुण्य फळाला आलें, गेले त्यांची पुण्याई फळली ।
परिस्थितीनें हतबल होउन आंग्लशाही ती फळली ॥ १ ॥
दिवस यापरि जातां, एके दिवशीं मध्यान्हीं रात्रीं ।
वेळ आलि अन् घटका भरली स्वतंत्रदेवी अवतरली ॥ २ ॥
दुमदुमती चौघडे नगारे धुंदींतच सगळे चालें ।
आंत भारतमाता स्रावें पाट चालले रुधिराचे ॥ ३ ॥
शुभसंदेश अन् बाळंतविडे आले आजूबाजूंचे ।
व्यवहारी व्यवहार पाळती स्वार्थावरती जग चालें ॥ ४ ॥
जागे झाले घरचे मोठे उत्सवांतुनी ते सुटतां ।
उपाय करुं या सगळे मिळुनी सर्वस्व पणाला लावुं अतां ॥ ५ ॥
सैरावैरा पाहुं लागलें वस्त्र, अन्न अन् औषधिला ।
सांपडेल ते वांटुन देऊं जगवूं म्हणती मातेला ॥ ६ ॥
कुठुनि तिला मग अळिवांचे अन् डिकाचे जे ते लाडू ।
उपदेशामृत नित्य पाजिती औषध जे ते कडू कडू ॥ ७ ॥
औषधांचि तर खात्री नव्हती बदल त्यामधें नित्य नवा ।
पांच गेलीं दहा गेलीं प्रयोग यांचा नित्य नवा ॥ ८ ॥
जुनेरावरी दिवस कंठणें घरच्या लक्ष्मीवरी आतां ।
'वनस्पती' ला खाउन गालीं गुलाब कैसा फुलायचा ॥ ९ ॥
जीवनसत्वें मिळतीं ना तीं कुठून रक्त मिळवयाचें ।
वेळीं सांडायला मग तें कुठून रक्त मिळावयाचें ॥ १० ॥
पावसाळी आसरा घराचा शॉवरबाथापरि गळतें ।
उन्हाळाही जागेचा तो बारा महिने मन जळतें ॥ ११ ॥

स्वतंत्रदेवीसाठीं आम्हीं काय तपाला कमि केलें ।
किति श्रेष्ठींनीं तिजसाठीं तर अर्पियलीं तीं शिरकमळें ।।१२।।
सोनेरी पिंजरा सोडुनी पळेही रावा वनांतरीं ।
खावें, प्यावें, गावें वाटें आंबराई ती मनांतरीं ।।१३।।
आमुच्या आशेची आंबराई वाळवंटी रूपांतर तें ।
मृगजळ शोधित आम्ही धांवतो प्यासें आसुसलेले ते ।।१४।।
सुवर्णभूमी होती अमुची वडिलोपार्जित संपत्ती ।
सुवर्ण गेलें भूमी उरली काळाची ही चमत्कृती ।।१५।।
सर्वस्वाचें दिवाळें हे कसली दिवाळी रे गड्या ।
कर्त्या हृदयीं आग पेटते उडती बघ त्या चिंधड्या ।।१६।।

## ४३. जनतेचा पुकार

जनतेचा हा पुकार आतां जगणार कि मरणार ?
आम्ही जगणार कि मरणार ।। धृ० ।।

जनतेसाठीं राज्य मिळविलें । जनतेनें ही प्राण अर्पिले ।।
गेले तेही स्वर्गीं रमले । उरलेल्यांचा सवाल आतां ।। १ ।।
संकटाच्या परंपरेनें । वातावरणीं हवाही कुंद ।।
सत्तेचा अभिलाषानें । लोकशाही झाली धुंद ।। २ ।।
कांही न कळे काय जाहलें ; जनतेचींहि मनेंहि सुंद ।
सवाल एकच उरला आतां । जगणार कि मरणार ।। ३ ।।
नाहीं मागत उंच हवेल्या । मिष्टान्नेंही नकोत तिजला ।
उंची कपडा कशास तिजला । परी खिसाही सदा मोकळा ।। ४ ।।
साधी भाजी आणिक भाकर । राहावयाही झोपडि सुंदर ।
जाडाभरडा कपडा साधा । साधी मागणी पुरी पडेना ।। ५ ।।
लोकशाहिचे सुंदर मंदिर । पायीं भरला जनता सागर ।
तोच खवळता बुडुन जाईल । घडविलेलें सुंदर मंदिर ।। ६ ।।

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वि: नों: दि:

## ४४. कर ! कर !! कर !!!

कर, कर, कर दुनिया बोले । त्राण अतां नाहीं उरलें ॥
मर, मर, मर दुनिया मरतें । कर भरण्या नाहीं जमतें ॥
कुर, कुर, कुर करिती पोरें । पोटाला बसती चिमटे ॥
भर, भर, कर दंडक बोले । ना तरि मी पाठीं बैसें ॥
धान्यावरि, पाण्यावरि तो । राहत्या घरावर बैसे ॥
विक्रीकर सर्वा धरतो । वाहन कर वरती बैसें ॥
नोंदणी मोजणी कर ते । बहुमुखि कर सर्वांवर ते ॥
कुणिही ना त्यांतुन सुटते । प्राप्तीही सर्वच गळते ॥
झिझिया कर औरंगजेबें । निर्मिलेच हे चंगेझें ॥
उरलीं हीं नुसति चिपाडें । तरी वर्षीं नवीन चरके ॥
जगला तर जगण्यावर ते । मेला तर मरण्यावर ते ॥
मेला अन जगला तरी ते । कर भरणें चुकणार न तें ॥
देवांना जातां भेटे । कर पहिले वेशीवर ते ॥
कर भरण्या देवहि भ्यालें । नाहिसें जगांतुन झाले ॥

●

## ४५. मानवतेस हांक

[ मध्यमवर्गीयांचें, आजचें घोंगडीवर काढलेलें, जिणें जगतांना रोजचा सबंध येणाऱ्या लोकांना मानवतेसाठीं मारलेली ही हांक आहे. ]

माणुसकीला जाग । मानवा । माणुसकीला जाग ॥ धृ० ॥
साठेबाजी नफेबाजी करुनी वरती दिमाख गाजी ।
सोड सोड रे, तुझि ही बाजी । माणुसकीला जाग ॥ १ ॥
भाडेकऱ्यांची सोय पाहुनी । वेळीं भाडें तसें देउनी ।
उभयतां तुम्ही सुखे नांदुनी । माणुसकीला जाग ॥ २ ॥
पक्षकारा नाडुनि उठवी । मजले सारे गाडुनि त्यासी ।
फुकट फुकट रे तुझी सरस्वती । माणुसकीला जाग ॥ ३ ॥
बाटल्यामधें रंगित पाणी । वाटे लाविसि समस्त रोगी ।
तपास अपुलें हृदय आंतुनी । माणुसकीला जाग ॥ ४ ॥

पदरीं पडुनि पवित्र झाली । हांका मारिसि उगी अतां तरि ।
आठव जागव अपुली संस्कृति । माणुसकीला जाग ।। ५ ।।

स्वराज्य आतां अपुलें हाता असहाय ही सारी जनता ।
मानवतेला मारी हांका । माणुसकीला जाग ।। ६ ।।

आपण सगळे एका घरचें । नातें अपुलें अगदी जवळचें ।
माणुसकीला गाडुनि जगणें कसलें तें जगणें ।
मानवा माणुसकीला जाग ।। ७ ।।

●

## ४६. शांतीचा ढोल

[ शांतीचा आवाज जोरजोरानें घुमूं लागला कीं युद्धाचा संभव वाढूं लागतो. ]

शांतीचा ढोल वाजे ढमढमा ।
रणशिंगाकरितां येई तो कामा ।। धृ० ।।

राष्ट्राराष्ट्रांचे नेते जमतात ।
वादावादांच्या फैरी झडतात ;
जगताच्या शांतीचे राष्ट्राच्या शांतीचे ।
गातात ईर्षेनें पोवाडे–गान ।। १ ।।

स्वार्थाच्या शांतीचें स्वागत सर्वांना ।
शांतीस्तव युद्धें हीं मान्यच सर्वांना ।
आत्म्याच्या शांतीस्तव धडपड ही सारी ।
सत्य, शांतीची बूज न कोणाला ।। २ ।।

एकामागुनी हीं युद्धेंही होतीं ।
राष्ट्रराष्ट्रांच्या पिढ्या तिथें मरती ।
थकल्यावर यांना शांतीची गोडी ।
शांती गाण्याला मिळे नवी स्फूर्ती ।। ३ ।।

●

## ४७. रामराज्य

छत्तिस गुण ते जमुनि पत्रिका।
छत्तिसाचा आंकडा।
लग्न होउनी सौ. माहेरी।
जागेला पारखा।। १ ।।

शेतकरी तो असुनि स्वतःच्या।
अन्नाला पारखा।
विणकरही तो असुनि स्वतांच्या।
वस्त्राला पारखा।। २ ।।

शाळा कॉलेजें असुनि परि का।
ज्ञानाला पारखा।
सर्वतोपरि लायक असुनी।
चाकरिला पारखा।। ६ ।।

कायद्यामधें रोज नवी भर।
न्यायाला पारखा।
लोकशाहिची अजब करामत।
भाषणास पारखा।। ४ ।।

सर्कस तारेवरली सगळी।
स्वास्थ्याला पारखा।
मरणें नाहीं म्हणुनि जगणें।
सर्वांला पारखा।। ५ ।।

रामराज्य तें होउनि गेलें।
सत्ययुगामधलें।
रामराज्य हें होउं पाहतें।
कलीयुगामधलें।। ६ ।।

●

## ४८. प्रणाम माझा

"स्वराज्य माझा जन्मसिद्ध हा हक्क असे" ज्यानें ।
स्वातंत्र्याचा महामंत्र हा दुमदुमिला ज्यानें ।
त्या नरसिंहा लोकमान्या बाळ गंगाधरा ।
प्रणाम माझे शतशः त्याला त्या भारतवीरा ॥ १ ॥

निसर्गनिर्मित नंदनवनिचा कोंकणचा बाळ ।
स्वातंत्र्याच्या शत्रूंना तो भासतसे काळ ।
म्हणुनि कोंडिलें त्या नरसिंहा मंडाले कारां ।
प्रणाम माझे शतशः त्याला त्या भारतवीरा ॥ २ ॥

केसरी-मराठा शस्त्रें ज्याचीं घाव घालतां उरीं ।
घावाची ती खूण नसे पण घाव बसतसे उरीं ।
स्वातंत्र्य संगरीं अविश्रांत जो लढला त्या शूरा ।
प्रणाम माझे शतशः त्याला त्या भारतवीरा ॥ ३ ॥
पुण्यभूमिला तेज चढविलें ज्या पुण्यात्म्यानें ।
गीतचा संदेश देउनी घरोघरीं ज्यानें ।
गीतारहस्य कर्त्याला त्या खऱ्या कर्मवीरा ।
प्रणाम माझे शतशः त्याला त्या भारतवीरा ॥ ४ ॥
अमोल रत्नें इथें निपजली इतिहासच साक्षी ।
त्यांच्या मधला कोहिनूर हा दिशादिशा फुलती ।
त्याच्या तेजमधें नहातों आम्ही त्या भास्करा ।
प्रणाम माझे शतशः त्याला त्या भारतवीरा ॥ ५ ॥

●

## ४९. आज उभा हा मानव

आज उभा हा मानव वरती ।
पहा हिमालय नमला जगतीं ॥ धृ० ॥

जगतामध्यें उंच भारती ।
उंचचि ठरला करा आरती ।

... ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ...
३८९९ वि: काव्य ४५
१६७० नों दि ५।३।६९

सदाच अमुचें निशाण वरती ।
पुन्हाचि प्रत्यय जगा संप्रती ।। १ ।।
घडलें नव्हतें घडलें जगतीं ।
झडले चौघडे झडल्या नौबती ।
प्रयत्नवाद्यांची ही सरशी ।
नरसिंहाची ही डरकाळी ।। २ ।।
याच भूमितुन व्यास वाल्मिक ।
बुद्धगांधींची इथें निर्मिती ।
कोहिनूराच्या इथेंच खाणी ।
शेरा सव्वा इथेच मिळती ।। ३ ।।
जगतामधली उंची संस्कृति ।
वडिलोपार्जित मक्तेदारी ।
परंपरेची उज्ज्वलता ही ।
जबाबदारी पुढच्या पिढीची ।। ४ ।।

●

## ५०. गिरके

किती गिरके किती फिरके । फिरून आहों जिथें तिथें ।। धृ० ।।
आदि मानव त्याची नीती । बळी असे तो कान पिळी ।
सुधारलेली नवी आवृत्ति । बळी घेऊनी स्वत: गिळी ।
काय फेर तो झाला कोठें । कुणा कळेना कुणा कळें ।। १ ।।
आदि राहे गटागटानें । ग्रामें नगरें आतां राहे ।
जातीं वांया जीवनसत्वें । शिजल्या अन्ना पुन्हा कळें ।।
काय फेर तो झाला कोठें । कुणा कळेंना कुणा कळें ।। २ ।।
जाती नव्हत्या तेव्हां कांहीं । आहे तैसें अतां राज्यही ।
गटागटांचे नेते होते । अतांही नेते तसेच आहेत ।
काय फेर तो झाला कोठें । कुणा कळेना कुणा कळें ।। ३ ।।
आदि स्त्री ती आजही आहे । सीता अहिल्या तारा आहे ।
अशी मेनका रंभा आहे । स्वभाव त्यांचे जसे तसे ।
काय फेर तो झाला कोठें । कुणा कळेना कुणा कळें ।। ४ ।।

नव्या संस्कृति नवीन राज्यें । नवे धर्म ते आले गेले ।
पहिले गेले नवीन आले । आपण आहों जिथें तिथें
काय फेर तो झाला कोठें । कुणा कळेना कुणा कळें ॥ ५ ॥
सर्वही आहे जेथें तेथें । पुराणींच तीं श्रद्धास्थानें ।
फुका बढाई मारे चाले । आपण जातों पुढें पुढें ।
काय फेर तो झाला कोठें । कुणा कळेना कुणा कळें ॥ ६ ॥

## ५१. नवेंच गाणें

नको नको तीं अतां बंधनें ।
नव्या जगाचें नवेंच गाणें ॥ धृ. ॥

विद्याधर तें पदरीं पडलें ।
तसेच कोणी हळूच आलें ।
कशास आतां वडिल माणसें ।
राजा–राणी–नकोच तिसरें ॥ १ ॥

व्यास वाल्मिकी आले गेले ।
कालिदास, ज्ञानेश्वर मागें ।
मुक्त छंदें लिहा हवें तें ।
पिपांत उंदिर सारे मेले ॥ २ ॥

शिष्याला ते वाटे गुरुचे ।
चाकरास ते धनीपणाचे ।
सुनेस सासूचेंहि जाचें ।
कर्त्याला तो समाज जाचे ॥ ३ ॥

विचारांचें आचारांचें ।
बंधन आतां झुगारून तें ।
ठरलें आहे जगावयाचें ।
पहा तुम्हांला कुठवर जमतें ॥ ४ ॥

## ५२. आरोहण कां

[ चालू प्रत्येक पिढी मागच्या पिढीला सांगत असते कीं, 'जग फार पुढें चाललें आहे.' आपणा सर्वांना जगाबरोबर चाललेंच पाहिजे. आपण खरोखरच पुढें चाललों आहों काय ? ]

काळ बदलला नूर बदलला । आम्हीं चाललों म्हणे पुढें ।
आरोहण का अवरोहण कीं । पुढें खरें पण कुठें पुढें ॥ १॥

विज्ञानाची काय थोरवी । म्हणे पहा हीं नवीन शस्त्रें ।
भारतपर्वा नव्हतीं का । श्रेष्ठ यांहुनीं तीं अस्त्रें ॥ २ ॥

इमारती या नव्या नि मोठ्या । दुरुस्ती लागे वर्षोवर्षीं ।
ताजमहाल न् गोलघुमट तो । चिरा न निखळे वर्षोगणती ॥ ३ ॥

सामर्थ्याचें अम्हांस कौतुक । पूल नद्यांवर अजस्र हे ।
रामायणीं ती नोंद ध्यानिं घ्या । नामें मात्रें तरले जे ते ॥ ४ ॥

दस चित्रें अन् दस मूर्ती या । गांवोगांवीं प्रदर्शनीं त्या ।
अजंठ्याचीं वेरूळचीं अन् । असंख्य लेणीं जरा बघा ॥ ५ ॥

तलम कपड्यांचें हें भूषण । फिनले मँचेस्टरची जोडी ।
जरा आठवा आंब्याच्या त्या । बाठ्यांतील धोतरजोडी ॥ ६ ॥

कविश्रेष्ठ ते अजरामर जे । काव्य प्रसवले अमर असें जें ।
नवकाव्याचा धुडगुस चाले । ऐरावत तो तट्टाणि साजे ॥ ७ ॥

महिनोमहिने रतिब डॉक्टरा । साठीची ती कोण प्रतिष्ठा ।
शतायु होती तरीही लढती । कोठें त्यांची ती प्रतिष्ठा ॥ ८ ॥

शब्दासाठीं प्राण अर्पिलें । मानवतेला जगवाया ।
मानवतेचा खून घरोघरीं । आम्हीहि जगतों जगतीं या ॥ ९ ॥

ग्रं. क्र. ४४०८

## ५३. आकांक्षा

भारताच्या स्वतंत्रतेची पूर्ती होईल कधीं ? ।
इतिहासाची पुनरावृत्ती होईल आतां कधीं ? ।।

ऋषीमुनींच्या वेदमंत्रें, संपन्नचि झालों ।
बुद्धाच्या त्या शिकवणीमुळें कीर्तिमान झालों ।
गांधींच्याही व्यक्तित्वानें, स्वतंत्रही झालों ।
या सर्वांच्या तपोबळानें । जगिं नेते ठरलों ।। १ ।।

नवरत्नें बहुश्रेष्ठ निपजलीं, अमुच्या खाणींत ।
अमोल रत्नें प्रकाश त्यांचा, तीन्ही खंडांत ।
वंशज आम्ही त्या श्रेष्ठींचे लायक होऊं कधीं ।
रक्ताचा का गूण लोपतो, काळहि फिरला जरी ।। २ ।।

ठिणगी आहे, नाहीं विझला पूर्णपणें अग्नी ।
फुंकर घालुन प्रज्वलित तो होइल हो सत्वरी ।
त्याच अग्निची प्रभा फांकतां दशदिशा उजळतील ।
अपुलें मुखही त्यांच्या संगे जगतीं उजळेल ।। ३ ।।

REFBK-0014084
REFBK-0014084

प्रकाशक : श्री. आबा बी. पंत, श्रीकृष्ण ग्रन्थ भांडार, टिळक रोड, पुणें २.
मुद्रक : बा. रा. वर्तक प्रशान्त प्रिंटिंग प्रेस,
४६१/१ सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणें २.

सर्वाधिकार : सौ. शालिनी वसंत खाडिलकर यांचे स्वाधीन
C/o वसंत माधव खाडिलकर १२८६ सदाशिव पेठ,
चिमण्यागणपती चौक, पुणें २.